ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ पुणें, बुधवार तारीख ११ फेब्रुवारी, १९५९ अंक ६

## विविध माहिती

**अमेरिकेंत शिक्षकांचा तुटवडा**—अमेरिकेंतील शाळांतून शिक्षकांचा तुटवडा असल्याची माहिती एका प्रसिद्ध अमेरिकन शिक्षणशास्त्रज्ञानें मुंबई येथें सांगितली. शिक्षकांचा तुटपुंजा पगार, मुलांची वाढती संख्या आणि शिक्षकाच्या व्यवसायांत शिरणाऱ्या लोकांवर पात्रतेसंबंधीं घालण्यांत आलेल्या लायकीच्या अटी, ह्यांच्यामुळें ही परिस्थिति उद्भवली असल्याचें त्यांनीं सांगितलें.

**एअर इंडियाचीं नवीं विमानें**—एअर इंडिआ इंटर नॅशनल ह्या कंपनीनें जगांत सर्वांत मोठीं असलेलीं 'बोइंग ७०७' ही विमानें आपल्या दलांत घेण्याचें ठरविलें आहे. कंपनीनें ह्या प्रकारच्या तीन विमानांची मागणी नोंदविली असून ती पुढील वर्षाच्या प्रारंभीं मुंबई येथील सांताक्रूझ विमानतळावर उतरतील. त्यांच्यासाठी विमानतळावरील घसरपट्टी मोठी करावी लागेल.

**लोकनृत्याच्या कार्यक्रमापासून प्राप्ति**—प्रजासत्ताक-दिनाच्या निमित्तानें दिल्ली येथें लोकनृत्यांचे जे कार्यक्रम करण्यांत आले त्यांच्यापासून ९०,००० रुपयांची प्राप्ति झाल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. ह्या कार्यक्रमापासून मिळालेल्या उत्पन्नाचा हा उच्चांक आहे. गेल्या वर्षी ह्या कार्यक्रमाचे ४०,००० रुपये उत्पन्न झालें होतें.

**ब्रिटनचें दुर्बल नौकादल**—ब्रिटनच्या नौकादलाचे युद्ध-कालीन ॲड्मिरल व्हायकाऊंट कनिंगहॅम ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, ब्रिटनचें सध्यांच नौकादल अणु बॉम्बसचा आधार घेतल्या-खेरीज मर्यादित युद्ध खेळण्यासहि समर्थ ठरणार नाहीं. ब्रिटिश नौकादलांत नव्यानें समाविष्ट करण्यांत येणारीं जहाजें २० वर्षां-पूर्वीं बांधण्यास घेतलेलीं होतीं, असेंहि ते म्हणाले.

**संयुक्त अरब संघाशीं व्यापार**—गेल्या कांहीं महिन्यांत संयुक्त अरब संघानें भारताकडून ७० लाख रुपये किंमतीचा माल आयात करण्याचे परवाने दिले आहेत. भारताकडून संघ-राष्ट्रांत निर्यात होणाऱ्या नेहमींच्या मालापेक्षां वेगळ्या मालासाठी हे परवाने दिलेले आहेत. त्यांचा उपयोग करून विजेचीं उपकरणें, शिवणाचीं यंत्रें, लोखंडी सामान, औषधें, इत्यादि माल संघ आयात करील.

**ऑलिंपिक सामन्याचीं तिकिटें**—१९६० सालीं रोम येथें होणाऱ्या ऑलिंपिक सामन्यांच्या खेळाचीं तिकिटें भारतांत ह्या वर्षीं मिळूं शकतील. सामन्यांच्या संघटकांनीं अर्ध्या जागा इटलीसाठी व बाकीच्या जागा सामन्यांत भाग घेणाऱ्या देशां-साठी ठेवल्या आहेत. ह्या वर्षीं तिकिटें फक्त राखून ठेवण्यांत येतील; त्यांची प्रत्यक्ष विक्री १९६० सालींच होईल.

**भारतामधील टेलिव्हिजन**—ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पो-रेशनचे डायरेक्टर-जनरल सर आदन जेकब ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, भारतांत दूरचित्रवाणीसारखीं जनमन-रंजनाचीं साधनें वापरण्यास सुरुवात करण्याआधीं रेडिओचा प्रसार अधिक मोठ्या प्रमाणावर करून त्यावरील कार्यक्रम अधिक लोकप्रिय करण्यांत यावेत.

**जपानचे लोक चैनी आहेत**—बॉंबे स्टेट वुइमेन्स कौन्सि-लच्या अध्यक्ष श्रीमती बिलिमोरिआ नुकत्याच जपानला जाऊन आल्या. जपानमधील समाजाचें निरीक्षण करतांना त्यांना असें दिसून आलें कीं, सर्वसामान्य जपानी नागरिक अन्नासारख्या महत्त्वाच्या पदार्थापेक्षा चैनीच्या वस्तूंवर अधिक खर्च करतो. आशिआंतील राष्ट्रांत जपानचें राहणीचें मान त्यांना अधिक उच्च वाटलें.

**अन्नधान्याच्या बदला मँगेनीझ**—अमेरिका आणि भारत ह्यांच्या दरम्यान वस्तूंच्या ऐनजिनसी बदलाचा करार होण्याचा संभव आहे. करार झाल्यास भारत अमेरिकेकडून ४,५०,००० टन अन्नधान्य घेऊन त्याच्या बदला तितक्याच किंमतीचें मँगेनीझचें खनिज पुरवील. भारतातर्फे हा करार स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन करणार आहे.

**साखर अधिक मिळणार**—चीनमध्यें साखरेचें वांटप दरमाणशीं दरमहा अर्धा पौंड असे ठेवण्यांत आलें होतें, तें १९५९ सालीं अधिक करण्यांत येणार आहे. चीनमधील सर्व पिकें भरघोस आल्याच्या बातम्या येत असतात. त्यांच्याशीं साखरेचें वांटप विसंगत वाटतें. चीनच्या शेतकी खात्यानें उंसाची व बीटची लागवड गेल्या वर्षी खूप वाढल्याचाहि दावा केला होता.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकें

### १० एप्रिल, १९५९ पूर्वी अर्ज पाठवा

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजतर्फे प्रतिवर्षी कल्पक व होतकरू कारखानदारांना गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकें दिलीं जातात. गेल्या वर्षी ह्या पारितोषिकांचा बारावा वितरण समारंभ खासदार श्री. जी. डी. सोमाणी यांच्या हस्तें सोमवार दि. १६ जून, १९५८ रोजीं चेंबरचे अध्यक्ष श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन (१) पैसा फंड ग्लास वर्क्स, तळेगांव दाभाडे यांस त्यांच्या सिग्नलिंग ग्लास बद्दल रु. १५० (२) महाराष्ट्र लिथो प्रेस, पुणें यांस त्यांच्या टेक्सटाईल गोल्डलीफ ट्रॅन्सफरबद्दल रु. १०० व (३) सिएम ट्रेडिंग कंपनी, मुंबई यांस त्यांच्या पेपर स्लीव्हजबद्दल रु. १०० याप्रमाणें पारितोषिकें देण्यांत आलीं होतीं.

ज्या कारखानदारांनीं एखादी नवीन वस्तु बनवून ती बाजारपेठेंत यशस्वीरीत्या खपविली असेल अशा संयुक्त महाराष्ट्रांतील कोणाहि कारखानदारास या पारितोषिकासाठीं अर्ज करतां येईल. पूर्वी ज्या वस्तूंसाठी पारितोषिकें दिलीं गेलीं असतील अशा वस्तूंकरितां पुनः अर्ज करतां येणार नाहीं. मात्र पूर्वी अर्ज केले होते परंतु ज्या वस्तूंना बक्षिसें मिळालीं नाहींत अशा वस्तूंच्या कारखानदारांनाहि पुनः अर्ज करण्यास मुभा आहे.

पारितोषिक समितीस योग्य वाटेल त्याप्रमाणें एक किंवा अधिक पारितोषिकें दिलीं जातील. सदर पारितोषिकांची रक्कम कै. गो. स. पारखे यांच्या स्मृतिदिनीं म्हणजे दि. १६ जून १९५९ रोजीं समारंभपूर्वक रोखीनें देण्यांत येईल; तसेंच चेंबरच्या अध्यक्षांच्या स्वाक्षरीचें प्रशस्तिपत्रहि त्याच वेळीं दिलें जाईल.

चालू सालच्या गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकांसाठीं अर्ज करूं इच्छिणाऱ्या कारखानदारांनीं चेंबरकडून अर्जाचा नमुना त्वरित मागवून घ्यावा व तो रीतसर भरून पारितोषिकार्थी वस्तूसह दि. १० एप्रिल, १९५९ पूर्वी कार्यवाह, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, टिळक रोड, पुणें २ यांजकडे भरून पाठवावा.

---

### अमेरिकन व कनेडिअन मिशनऱ्यांची संख्या वाढली : भारताकडे विशेष लक्ष

१९५० च्या मानानें आतां परदेशांत मिशनरी काम करणाऱ्या अमेरिकन व कनेडिअन प्रॉटेस्टंट मिशनऱ्यांच्या संख्येंत किमान १०,००० ची भर पडली आहे. त्यांची एकूण संख्या (२५,०५८) पन्नास वर्षांपूर्वीच्या मानानें चौपटीपेक्षा मोठी आहे. सेवन्थ-डे अॅड्व्हेन्टिस्टसची सभासद-संख्या अमेरिकेंत फक्त २,९१,५६७ आहे; पण ते १८४ देशांतील २,००० स्त्री-पुरुष मिशनऱ्यांचा परदेशांतील खर्च चालवीत आहेत. ख्रिश्चन अँड मिशनरी अलायन्सची सभासद-संख्या ८७,६६३ असून ती संस्था ८२२ मिशनऱ्यांचा खर्च चालवीत आहे. प्रॉटेस्टंट एपिस्कोपल चर्चचे तत्सम आंकडे ३०,२४,८५१ सभासद व परदेशांत ४१० मिशनरी असे आहेत. मिशनरी चळवळीच्या दृष्टीनें भारताचा अनुक्रम पहिला लागतो; भारतांत १,८८२ अमेरिकन व कनेडिअन प्रॉटेस्टंट मिशनरी आहेत. जपानमध्यें १,५४९ आहेत. एकूण मिशनऱ्यांपैकी फक्त २.९६% पश्चिम आशियांत आहेत. प्रॉटेस्टंट मिशनऱ्यांत पुरुष व स्त्रिया ह्यांचें प्रमाण २ : ३ असें आहे.

**ओरिसांतील पराभवाचें कारण—** ओरिसा राज्यांत नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकींत गणतंत्र परिषदेच्या उमेदवारानें काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केला. पराभवाची मीमांसा करतांना ओरिसाचे एक मंत्री म्हणाले कीं, ओरिसांतील पंचायतींनीं बसविलेले कांहीं कर लोकांना आवडले नाहींत. शिवाय, शेजारीच दारू पिण्यावर निर्बंध नसतांना रानटी जमातींच्या मतदारसंघांत मात्र दारूबंदी जारी होती, त्याचाहि परिणाम झाला.

---

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल

### १० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें १

विद्यालयाचा पुढील शिक्षण-वर्ग दि. १ एप्रिल १९५९ पासून सुरू होईल. विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, सब-ऑडिटर, खरेदी विक्री संघ, विविध कार्यकारी सोसायटी, व इतर मोठ्या सहकारी संस्थांचे सेक्रेटरी, या दर्जाच्या नोकरवर्गाना शिक्षण दिलें जातें. विद्यालयाचा शिक्षणक्रम सहा महिने मुदतीचा आहे.

सहकारी सोसायटींत काम करणारे उमेदवार एस. एस. सी. उत्तीर्ण नसल्यास, त्यांनी सहकारी संस्थेंत कमीत कमी तीन वर्षे नोकरी केलेली असली पाहिजे आणि ते इंग्रजी दहावी, व्हर्नाक्युलर फायनल किंवा सेक्रेटरी शिक्षण-वर्ग परीक्षा पास असले पाहिजेत. जागा शिल्लक असल्यास एस. एस. सी. पास झालेल्या विद्यार्थ्यांना खाजगी उमेदवार म्हणून प्रवेश मिळूं शकेल. तसेंच वरीलप्रमाणें शैक्षणिक पात्रता असल्यास स्त्रियांनाहि प्रवेश मिळूं शकेल.

प्रवेश दिलेल्या सोसायट्यांचे उमेदवारांना दरमहा रुपये ४० प्रमाणें स्टायपेंड मिळेल व प्रात्यक्षिक शिक्षणाचे मुदतींत रु. ६० प्रवासभत्ता मिळेल. खाजगी उमेदवारांना स्टायपेंड मिळणार नाहीं.

(अ) सहकारी संस्थांत नोकरी करणाऱ्या उमेदवारांनीं आपल्या संस्थेच्या ठरावाच्या नकलेसह प्रवेश अर्ज आपल्या जिल्ह्याच्या सहकारी बोर्डामार्फत आमचेकडे दि. ६ मार्च १९५९ पूर्वी पोंहोंचतील अशा बेतानें पाठवावेत. या अर्जाची एक आगाऊ प्रत विद्यालयाकडे सोसायटीमार्फत पाठवावी. परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाहीं.

(ब) खाजगी उमेदवारांनीं आपले अर्जाची एक प्रत परस्पर विद्यालयाकडे पाठवावी व एक प्रत त्या जिल्ह्याचे जिल्हा सहकारी बोर्डामार्फत पाठवावी. या उमेदवारांनीं अर्जासोबत प्रवेश फी पाठवूं नये.

विद्यालयाचे प्रवेशअर्ज व माहितीपत्रकें यांची किंमत ५० नये पैसे आहे. फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयाचे कचेरींत व जिल्हा सहकारी बोर्डाचे ऑफिसांत सुटीचे दिवसाखेरीज रोज ११-३० ते ५ व शनिवारीं सकाळीं ८-३० ते ११ या वेळांत मिळूं शकतील. अर्जाची मागणी करतेवेळीं ५० नवे पैसे रोख भरावेत अगर मनिऑर्डर पाठवावी. पोस्टाचीं तिकीटें पाठवूं नयेत.

पुणें, ठाणें, कुलाबा, रत्नागिरी, कोल्हापूर, उत्तर सातारा व दक्षिण सातारा या जिल्ह्यांतून येणाऱ्या उमेदवारांनाच फक्त या विद्यालयांत प्रवेश मिळूं शकेल.

र. द. भोसेकर,
सुपरिन्टेन्डेन्ट.

# अर्थ

बुधवार, ता. ११ फेब्रुवारी, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकारी शेतीनें धान्याचें उत्पादन वाढेल काय ?

### श्री. मुनशी यांची स्पष्टोक्ति

नागपूर येथें भरविण्यांत आलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी सहकारी शेतीची कास धरण्यांत यावी असा ठराव मंजूर करण्यांत आला आहे. सहकारी शेतीचा अवलंब केल्यानें धान्याचें उत्पादन वाढण्यास तर साह्य होणार नाहींच; उलट त्यामुळें हुकुमशाहीचा मार्ग मात्र खुला होईल असें मत उत्तर प्रदेशाचे माजी गव्हर्नर श्री. कन्हय्यालाल मुनशी त्यांनीं व्यक्त केलें आहे. दिल्ली येथील इतिहासविषयक संस्थेपुढें 'हुकुमशाही: जुनी व नवी' ह्या विषयावर बोलतांना ते म्हणाले कीं, सहकारी शेतीच्या कार्यक्रमांत बराच बदल केल्याशिवाय तो यशस्वी रीत्या अमलांत आणणें अशक्यच आहे. पुरेसा पैसा अगर शिकून तयार झालेलीं माणसें ह्या दोहोंचीहि वाण आहे. बहुतेक सर्व सहकारी संस्था पतपेढ्या असून त्यांना पैशाचा बहुतेक पुरवठा स्टेट बँकेकडून होतो. सभासदांकडून जेमतेम एक एकदशांश पैसा पुरविला जातो. कायदे करून अगर ठराव करून जमिनीविना असणाऱ्या शेतमजुरांना कुशल शेतकरी बनवितां येणार नाहीं. अशा स्थितींत सहकारी शेतीचा कार्यक्रम सुलभ रीतीनें अंमलांत आणतां येईल अशी अपेक्षा करणें म्हणजे खोट्या आशेला उत्तेजन देणें आणि परिणामीं निराशा पदरीं पाडून घेण्यासारखें आहे. ज्यांना लोकशाही आवडत नाहीं अशा लोकांच्या कडून जालीम उपायांची मागणी केली जाण्याचे आवाहन केल्यासारखेंच तें होईल.

भारतांत सहकारी शेतीचा प्रयोग मद्रास, पंजाब व इतर अनेक ठिकाणीं करण्यांत आलेला असून, अयशस्वी ठरल्यामुळें तो सोडून द्यावा लागलेला आहे. उत्तर प्रदेशाच्या गव्हर्नरनें माजी सैनिकांच्या सहकारी–शेतीसंस्था स्थापन करण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. ह्या संस्थांना माजी सैनिकांच्या निधींतून द्रव्यसाह्य मिळणार होतें. भारतामधील प्रत्येक शेतकऱ्याला आपला जमिनीचा तुकडा प्राणापेक्षांहि प्यार वाटतो. तो तुकडा सहकारी शेतींत समाविष्ट करून घेण्यास शेतकरी स्वेच्छेनें कधींहि तयार होणार नाहीं. शेतीचें उत्पादन वाढविणें हा जर हेतु असेल तर त्यासाठी सहकारी शेती हा उपाय नव्हे. हा उपाय म्हणजे भयंकर आपत्ति ठरल्याशिवाय राहणार नाहीं. जगांत कोठेंहि सहकारी शेतीनें उत्पादनास उत्तेजन मिळालेलें नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत जपान व इस्राइल ह्या दोनच देशांनीं शेतीचें उत्पादन आश्चर्यकारक रीतीनें वाढविलेलें दिसून येतें. पण तेथील यशाचीं कारणें वेगळीं आहेत. शेतकऱ्याची शेती त्याच्याच मालकीची ठेवणें, नफ्याचें प्रलोभन ठेवणें, खताचा मुबलक पुरवठा करणें, सुधारलेल्या बीं-बियाणांचा उपयोग करणें, मालाचा सांठा व त्याची विक्री सहकारी संस्थांमार्फत करणें, इत्यादि उपायांनीं उत्पादन वाढलेलें आहे. भारतासारख्या गरीब देशांत अजून कित्येक वर्षे शेतकऱ्याच्या कुटुंबाचे कष्ट ह्याच एका साधनानें उत्पादनाची गति वाढवितां येणें शक्य आहे.

नियोजन समितीनें 'सक्तीचें सहकार्य' स्वीकारलेलें आहे. उलटपक्षीं, पंतप्रधान व इतर पुढारी ह्यांनीं सहकारी शेतीच्या कार्यक्रमांत सक्ति असूं नये असें सुचविलें आहे. सक्ति करावयाची नाहीं असें ठरविल्यावर सहकारी शेतीच्या हातांत कांहींच सत्ता देतां येणार नाहीं. उलट, सक्तीचा आश्रय केल्यास भारतांत हजारों वर्षे चालत असलेली शेतीची रचना कोलमडेल. ज्या शेतकऱ्यांजवळ आर्थिक दृष्ट्या परवडणारी जमीन असेल त्यांना सहकारी शेतींत घ्यावयाचे नाहीं असें ठरल्यास ग्रामीण भागांत वर्गविरोधाची सुरुवात केल्यासारखें होईल; आणि मग अशी कांहीं प्रक्रिया सुरू होईल कीं द्वेष व हिंसा ह्यांच्या मार्गानें अखेर हुकुमशाहीचा अवतार होईल.

---

## रशिआच्या लष्करी सामर्थ्याचा अंदाज

अमेरिकन कॉंग्रेसची एक कमिटी सध्यां अमेरिकेच्या संरक्षण-व्यवस्थेसंबंधीं चौकशी करीत आहे. चौकशी कमिटीपुढें तज्ज्ञांच्या ज्या साक्षी झाल्या, त्यावरून कांहीं महत्त्वाची माहिती बाहेर आली आहे. रशिआ व अमेरिका ह्या बलाढ्य राष्ट्रांची लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी चाललेली शर्यत सर्वश्रुत आहेच. त्याच अनुषंगानें वरील चौकशी करण्यांत येत आहे. रशिआनें सोडलेला चंद्रवेधी अग्निबाण चंद्राच्या गुरुत्वाकर्षणाची कक्षा भेदून सूर्यमालेंतील उपग्रह म्हणून फिरत आहे. ह्या परिस्थितीचा अभ्यास करून अमेरिकन संरक्षणखात्याच्या शास्त्रीय तज्ज्ञांनीं असा अंदाज केला आहे कीं, अग्निबाणाच्या प्रक्षेपणाचें शास्त्र व अंतरिक्षभ्रमणाचें शास्त्र ह्यांच्या बाबतींत अमेरिका रशिआच्या १२ ते २० महिने मागें आहे. ह्या शास्त्रांत रशिआच्या बरोबरीला येण्यासाठी अमेरिकेला आपली गति बरीच वाढवावी लागणार आहे. रशिआजवळ अग्निबाणाची दिशा नियंत्रित करण्याची प्रभावी युक्ति असून अमेरिकेंतील कोठल्याहि भागावर अगदीं अचूक मारा करण्याचें सामर्थ्य आहे. सध्यां रशिआ व अमेरिका ह्यांच्या प्रगतीचा जो वेग आहे तो कायम राहिल्यास दोन वर्षांच्या अवधींत रशिआजवळ अमेरिकेच्या तिप्पट आंतरखंडीय अग्निबाण तयार होतील. तथापि, अमेरिकेनें आपलें संशोधन व प्रयत्न अधिक जोरकस केल्यास पांच वर्षांच्या अवधींत तिला रशिआची बरोबरी करतां येईल. सध्यां अमेरिकेजवळ ५०० मैल टप्प्याचे अग्निबाण असून ते रशिआच्या संरक्षणव्यवस्थेजवळ न जातां विमानानें सोडतां येतील. त्याशिवाय समुद्राच्या पोटांत दीर्घ काळ राहूं शकणाऱ्या पाणबुड्या आहेत. त्या समुद्रसपाटीवर येऊन १,००० मैल टप्प्याचे अग्निबाण सोडूं शकतील.

---

**रशिआला चीनचें भय**—फ्रान्सच्या संरक्षण-खात्याचे प्रमुख जनरल पॉल इलाय ह्यांनीं असें भाकीत केलें आहे कीं, आणखी २० वर्षांच्या अवधींत रशिआला चीनच्या भयानें पाश्चात्य राष्ट्रांशीं एकजूट करावी लागेल. ह्या काळांत चीनमधील १०० टक्के कम्युनिझम चांगला पोसलेला असेल व त्याच्या वाढलेल्या सामर्थ्याला रशिआला तोंड द्यावें लागेल.

## छोट्या उद्योगधंद्यांची १९५७–५८ सालांतील प्रगति

दि नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशननें १९५७–५८ मध्यें छोट्या उत्पादकांसाठी निरनिराळ्या सरकारी खरेदी खात्यांकडून ६२·१५ लाख रुपये किंमतीच्या मालासाठी मागणी मिळविली.

या कार्यक्रमाचा अधिक छोट्या उत्पादकांस लाभ मिळावा म्हणून या वर्षांत कॉर्पोरेशननें सुमारें १७४० छोट्या कारखान्यांची नोंदणी केली असून त्यानंतर या यादींत अनेक कारखान्यांची भर पडली आहे.

या कॉर्पोरेशननें बूट-निर्मितीच्या मागण्या छोट्या उत्पादकांत विभागून त्या पूर्ण करण्यांत यश मिळविलें. या वर्षांत सदर कॉर्पोरेशनकडून सोव्हिएट युनिअननें परत ६५,००० बुटांच्या जोडांसाठी व पोलंडनें अशा ५४,००० जोडांसाठी मागणी केली.

या कॉर्पोरेशनकडे सुमारें २·४ कोटी रुपये किंमतीचीं ३०४५ यंत्रें हप्तेबंदीनें पुरविण्यासाठीं ७६४ नवीन अर्ज या वर्षांत आले. अशा रीतीनें या वर्षाअखेर एकूण ३·३९ कोटी रुपयांहून अधिक किंमतीचीं ४१७५ यंत्रें हप्तेबंदीनें मिळविण्यासाठी स्वीकारलेल्या अर्जांची संख्या ११९३ वर गेली. या कालावधींत हप्तेबंदीनें सुमारें ६५·७८ रुपये किंमतीचीं ७८७ यंत्रें देण्यांत आलीं. गत वर्षी ११ लाख रुपये किंमतीचीं १९१ यंत्रें या रीतीनें देण्यांत आलीं होतीं.

प्रतवारी न ठरविलेल्या परंतु दि स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हिस इन्स्टिट्यूटसनीं पसंत केलेल्या यंत्रांचा पुरवठा करण्याचेंहि कॉर्पोरेशननें ठरविलें. या वर्षांत ओखला (दिल्ली) व नैनि (अलाहाबाद) येथील औद्योगिक वसाहतींची पहिली बांधकाम-अवस्था पूर्ण झाली.

सायकलींचे सुटे भाग आयात करण्याचें तसेंच राज्य सरकारांना छोटे उद्योगधंदे विकास योजनांत लागणारीं यंत्रें व यंत्र अवजारें पुरविण्याचें काम कॉर्पोरेशननें आपल्याकडे घेतलें. छोट्या उद्योगधंद्यांच्या लोखंड व पोलादाच्या गरजा भागविण्यासाठी कॉर्पोरेशननें लुधियाना येथें एप्रिल १९५८ पासून एक कच्चा माल पुरवठा-केंद्र चालू केलें. या कॉर्पोरेशनच्या घाऊक विक्री केंद्रांनीं या वर्षांत ६,७४,२३० रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली. त्यामागील वर्षाचा हा आंकडा १,२७,७४९ रुपये होता.

या वर्षांत कॉर्पोरेशनवर ओखला (दिल्ली) व राजकोट येथें दोन प्रोटोटाइप उत्पादन व शिक्षण केंद्रें उभारून तीं चालविण्याची जबाबदारी देण्यांत आली होती. यासाठीं भारत सरकारनें तांत्रिक सहकार्य मंडळाशीं केलेल्या करारानुसार पहिल्या दोन वर्षांत या मंडळाकडून ४,४८,४०० डॉलर किंमतीचीं यंत्रसामुग्री व ६ इंजिनिअरांचें साह्य मिळणार आहे. त्यांपैकीं ११ लाख रुपये किंमतीची यंत्रसामुग्री राजकोट केंद्रावर पुनर्विलोकनाच्या या वर्षाअखेर येऊन पोहोंचली. या केंद्रावर दरवर्षी सुमारें १५० तंत्रज्ञांस शिक्षण मिळेल. ओखला येथील केंद्र जानेवारी १९६० च्या प्रारंभीं सुरू होणार असून तेथें प्रतिवर्षी सुमारें ५०० तंत्रज्ञांस शिक्षण मिळेल.

**केरळांत लोखंडाचा सांठा**—केरळ राज्यांतील पालघाट विभागांत लोखंडाच्या खनिजाचा सांठा उपलब्ध झाला आहे. हा सांठा फारसा मोठा नाहीं. परंतु छोट्या उद्योगधंद्यांच्या गरजा भागविण्याइतके लोखंड त्यापासून तयार करतां येण्यासारखें आहे. खाणी चालविण्यासाठी एक परवाना देण्यांत आला असून आणखीहि परवाने दिले जाण्याची शक्यता आहे.

## रूरकेला व भिलई येथील पोलादाचे कारखाने

रूरकेला व भिलई येथें उभारण्यांत येत असलेल्या पोलादाच्या कारखान्यांतील झोत भट्टीचें उद्घाटन राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं केलें. भारतामधील लोकांच्या राहणीचें मान सुधारून त्यांना इतर प्रगत राष्ट्रांतील जनतेच्या बरोबर आणण्याच्या महान् प्रयत्नांचा पायाच पोलाद कारखान्यांच्या रूपानें घालण्यांत येत आहे. रूरकेला येथील कारखाना प्रथम असावा तितका मोठा नव्हता. पण नंतर ही चूक सुधारण्यांत आली आणि भिलई येथील कारखाना उभारतांना उत्पादन-क्षमता वाढविण्याच्या दृष्टीनें योग्य ती तांत्रिक तरतूद आधीच करून ठेवण्यांत आली. सर्वच पोलाद कारखान्यांचें उत्पादन सध्याच्या उत्पादनापेक्षा दुप्पट करतां येणार आहे. दुर्गापूर, भिलई व रूरकेला ह्या कारखान्यांतून दरसाल १० लाख टन पोलाद उत्पन्न होऊं शकेल. कारखाने उभारतांना बऱ्याच अडचणी आल्या. परंतु कांहीं बाबतींत भारत इतर देशांच्या मानानें अधिक सुदैवी आहे. कारखान्यासाठी लागणारा कोळसा, लोखंड व चुनखडीचा दगड भारतांत जवळ जवळ सांपडले आहेत, त्याचप्रमाणें पाणीहि मुबलक मिळण्यासारखें आहे. रशिआला मॅग्निटॉगोर्स्क येथील पोलादाचा प्रचंड कारखाना चालविण्यासाठी लागणारा कोळसा १,००० मैलांपेक्षा अधिक अंतरावरून वाहून आणावा लागतो. जपानला भारताकडून व इतर देशांकडून अशुद्ध लोखंड आयात करावें लागतें. ब्रिटनला नॉर्वेकडून अशुद्ध लोखंड आणावें लागतें. हिंदी कारखान्यांत कामें करून भारतीय एंजिनिअर्सहि तयार होत आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बोकॅरो येथें काढण्यांत यावयाच्या चौथ्या पोलाद कारखान्याची तयारी करण्याचें काम भारतीय एंजिनिअर्सकडे सोपविण्यांत आलें आहे. ह्यावरून एतद्देशीय तज्ज्ञांची संख्या वाढत चालल्याचें दिसतें.

## पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि.

पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि. या कारखान्यानें ३१ जुलै १९५८ ला पुऱ्या झालेल्या वर्षी चालू घसारा, मागील घसाऱ्याची एकूण बाकी आणि मॅनेजिंग एजंट्सचें कमिशन यांची तरतूद करून निव्वळ नफा सुमारें रु. २,७८,२८१ मिळविला. गेल्या सालची ओढलेली रक्कम २१,१८५ त्यांत मिळवितां वांटणीसाठी एकूण रक्कम रु. २,९९,५६६=६८ ची आली. संचालक मंडळानें या रकमेची वांटणी पुढीलप्रमाणें केली आहे:—

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंड | रु. २,००,०००=०० |
| डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड | रु. १०,०००=०० |
| डिव्हिडंडसाठी | रु. ६९,५७२=७० |
| पेस्तर सालासाठी | रु. १९,९९३=९८ |

डिव्हिडंड देण्याच्या बाबतींत प्रेफरन्स शेअरवर करमाफ ६ टक्के, इक्विटी शेअरवर करमाफ ६ टक्के, इक्विटी शेअरवर करमाफ बोनस डिव्हिडंड ४ टक्के देण्याची शिफारस संचालकांनीं केली आहे.

या कारखान्यानें गेल्या सालीं रु. ४०,८१,४१० ची विक्री केली होती, ती या सालीं रु. ५३,८९,८०० झाली असून उत्पादन-विस्ताराची योजना हातीं घेण्यांत आली आहे.

## प्रा. द. गो. कर्वे

प्रा. द. गो. कर्वे हे नेदरलंडस्, इटली, लॅटिन अमेरिका, इजिप्त, सुदान, इस्राएल, इत्यादि देशांच्या दौऱ्यासाठी गेल्या महिन्यांत मुंबईहून निघाले.

## पुणें सें. को. बँकेच्या बोर्डाची पुनर्घटना

पंचवीस सभासदांच्या बोर्डांत शेतकी सोसायट्यांचे १०, बिगर शेतकी सोसायट्यांचे २, व्यक्तिशः भागीदारांचे ८, मुं. रा. स. बँकेचा १, आणि मुंबई राज्य सरकारचे ३ प्रतिनिधी.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची विशेष साधारण सभा रविवार दिनांक १ मार्च, १९५९ रोजीं दुपारीं ४ वाजतां बँकेच्या मुख्य कचेरीचे सभागृहांत भरणार आहे. सदर सभेमध्यें बोर्डाच्या घटनेसंबंधीं बोर्डानें पोटनियम नं. ३३ मध्यें सुचविलेल्या व मान्य केलेल्या दुरुस्तीचा मुख्यतः विचार होणार आहे. ही दुरुस्ती मंजूर झाली, तर पोटनियम खालील-प्रमाणें होईल.

बँकेच्या धंद्याचा व कामकाजाची व्यवस्था दरसाल नेमलेल्या चेअरमन व व्हाईस-चेअरमन यांचेसह याखाली नमूद केल्या-प्रमाणें पंचवीस सभासदांच्या डायरेक्टरांचे बोर्डाकडे सोंपविण्यांत येईल.

(अ) शेतकी सोसायट्यांचे दहा प्रतिनिधि खालीलप्रमाणें:—

विभाग क्र. १ पुरंदर
विभाग क्र. २ हवेली आणि पुणें शहर तालुका
विभाग क्र. ३ दौण्ड
विभाग क्र. ४ शिरूर
विभाग क्र. ५ खेड
विभाग क्र. ६ इंदापूर
विभाग क्र. ७ बारामती
विभाग क्र. ८ जुन्नर
विभाग क्र. ९ आंबेगांव
विभाग क्र. १० भोर, वेल्हे महाल, मावळ व मुळशी.

(ब) बिगर शेतकी सोसायट्यांचे दोन प्रतिनिधि :—

पुणें शहर तालुक्यांतील बिगर शेतकी सोसायट्या—१

पुणें शहर तालुकाखेरीज करून पुणें जिल्ह्यांतील बिगर शेतकी सोसायट्या— १

(क) व्यक्तिशः भागीदारांनीं निवडून द्यावयाचे आठ प्रतिनिधि. त्यांपैकी एक पुणें शहर तालुक्याबाहेरचा कायम रहिवासी असला पाहिजे.

(ड) मुंबई राज्य सहकारी बँक लि. चा एक प्रतिनिधि, त्या बँकेनें नेमल्यास.

(इ) तीनपेक्षां जास्त नाहींत इतके मुंबई राज्य सरकारचे प्रतिनिधि, सरकारनें नेमल्यास.

(फ) एक मॅनेजिंग डायरेक्टर-पदसिद्ध.

### इतर कांहीं दुरुस्त्या

(१) शेतीच्या, औद्योगिक व उदीम मालाच्या चालू बाजारभावानें होणाऱ्या किंमतीच्या शेंकडा ७० टक्केपर्यंत कर्ज देतां येईल. सध्यां ही मर्यादा शेतीच्या मालाचे बाबतींत ६६% व इतर बाबतींत ५०% आहे.

(२) सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील सेफ्स सामान्यतः बँकेच्या सभासदांनाच भाड्यानें देण्यांत येतील. बिगरभागीदारांना मे. मॅ. डायरेक्टर यांचे परवानगीनें सेफ्स भाड्यानें देण्यांत येतील. सध्यां ५० रु. अनामत रक्कम घेतली जाते.

(३) बँकेच्या स्त्री-सेवकांना त्यांचे सबंध नोकरींत एकूण बारा महिन्यांची प्रसूतीसाठी रजा दिली जाईल. सदर रजा एका वेळीं जास्तींत जास्त तीन महिने मिळूं शकेल. आवश्यक असल्यास, या रजेस जोडून सेवकास देतां येण्यासारखी इतर रजा सेवकाकडून तसा अर्ज मेडिकल सर्टिफिकेटसह आल्यास मा. बोर्ड देऊं शकेल.

## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्सचें स्नेहसंमेलन

डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, पुणें, या संस्थेचें वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक-वितरण-समारंभ येथील मुंबई राज्याचे रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज डॉ. ए. यू. शेख, एम्. ए., पीएच. डी; आय. ए. एस्. यांचे अध्यक्षतेखाली पुणें महानगरपालिका विद्यालयाचे जागेंत साजरा झाला. प्रारंभीं संस्थेचे चिटणीस श्री. शं. ह. धूपकर यांनीं स्वागतपर भाषण व अध्यक्षांचा परिचय करून दिला; नंतर संस्थेचे मुख्याध्यापक श्री. अ. ग. भोपटकर यांनीं संस्थेचा अहवाल निवेदन केला. श्री. व. द. रिसबूड यांनीं स्नेहसंमेलनाचा अहवाल निवेदन केला. संस्थेचें संस्थापक प्रा. ग. कृ. भोपटकर यांनीं आपल्या भाषणांत संस्थेंत दिल्या जाणाऱ्या शिक्षणामुळें योजनाकालांतील सहकारी कार्यक्षेत्रांत पारंगत तज्ज्ञांची जी वाण आज भासत आहे ती दूर होण्यास कशी मदत होते ह्याचें विवेचन केलें. संबंधित सरकारी अधिकाऱ्यांनीं या संस्थेचें सहकार्य घेतल्यास जाणता व कार्यक्षम सेवकवर्ग मिळणें सुलभ जाईल असेंहि त्यांनीं सांगितलें. संस्थेंत शिक्षण घेऊन स्वतंत्रपणें दुकानदारी व कारखानदारी व्यवसाय सुरू करणाऱ्या विद्यार्थ्यास रु. २५ उत्तेजनपर पारितोषिक प्रतिवर्षी देण्याचा संकल्पहि त्यांनीं शेवटीं बोलून दाखविला.

### डॉ. शेख ह्यांचें भाषण

यशस्वी विद्यार्थी व विद्यार्थिनींना पारितोषिकें वांटल्यानंतर मुख्य पाहुणे डॉ. ए. यू. शेख आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले, व्यापार म्हणजे केवळ पिळवणूक करणें नव्हे. उत्पादन व विनिमय हीं सेवाभावानें जनतेच्या कल्याणासाठी शिस्तबद्ध रीतीनें करावयाचीं कर्तव्यें होत. व्यापार म्हणजे दुर्लक्ष करण्याजोगें अगर कमीपणाचें कांहीं नसून समाजवादी अर्थव्यवस्थेंत व्यापाराचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. ही जाणीव ह्या संस्थेनें समाजास करून दिली. शिस्तबद्ध व कार्यक्षम तरुण पिढी तयार करण्याचें कार्य ही संस्था गेलीं चाळीस वर्षें करीत आहे. संस्थेचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे अशी खात्री पटते. जनतेनें संस्थाचालकांच्या आकांक्षा पुऱ्या करण्यास पुढें यावें व समाजाची तीव्र गरज भागविण्यास तीस समर्थ करावें.

राष्ट्रगीत व आभार प्रदर्शन होऊन समारंभ संपला. प्रतिष्ठित निमंत्रित नागरिक सुमारें दोनशें उपस्थित होते. त्याच दिवशीं रात्रीं संस्थेच्या विद्यार्थिनींनीं श्री. ना. घों. ताम्हणकर लिखित 'बोलघेवड्या' व विद्यार्थ्यांनीं श्री. पु. ल. देशपांडे लिखित 'अंमलदार' ह नाट्यप्रयोग सादर केले.

---

### बॉबे क्रॉनिकल बंद होणार

दि बॉंबे क्रॉनिकल आणि दि बॉंबे सेंटिनल हीं मुंबईचीं वृत्तपत्रें बंद करण्यांत येणार असून त्याप्रमाणें तीं वृत्तपत्रें चालविणाऱ्या कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरांनीं संपादक खात्यांतील नोकरांना नोटीस दिली आहे. दि बॉंबे क्रॉनिकल हें सकाळीं प्रसिद्ध होणारें दैनिक सर फिरोजशहा मेहता ह्यांनीं मार्च, १९१३ मध्यें सुरू केलें होतें आणि दि बॉंबे सेंटिनल ह्या संध्याकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकाचें प्रकाशन मार्च, १९३३ पासून चालू आहे.

---

## हातमाग धंद्यांतील सहकार

हातमाग धंदा हा भारतांतील प्रमुख कुटीरोद्योग असून लक्षावधि लोकांना त्यांमुळें रोजगार मिळालेला आहे. परंतु केवळ लक्षावधि लोकांच्या उदरनिर्वाहाचें तें साधन आहे एवढ्याचसाठी नव्हे तर पिढ्यान् पिढ्या चालू असलेल्या विणकामांतील कसबामुळें सुंदर वस्त्रांबद्दल भारताची कीर्ति केल्याबद्दलहि हा धंदा महत्त्वाचा आहे.

या धंद्याचें एक मानवी अंग असून दुसरें प्रत्यक्ष व्यवसाय करतांना येणाऱ्या प्रश्नांसंबंधीं आहे, असें अ. भा. हातमाग मंडळ मानतें. या दोन्ही गोष्टींचा परस्परांवर परिणाम होऊन या धंद्यावर सध्यांची परिस्थिति ओढवलेली आहे. उत्पादनांत अनियमितता असूनहि विणकर परंपरागत उत्पादनपद्धतीसच मोठ्या निष्ठेनें टिकून राहतो.

उत्पादनाच्या दृष्टीनें पाहतां त्याच्याजवळील अनेक हत्यारें ओबडधोबड व पुराण्या काळाचीं असतात. उत्पादनाच्या जुन्या पद्धति, अत्यंत दारिद्र्य, माफक दरानें कच्चा माल मिळविण्यासाठी आणि तयार मालाचा किफायतशीर किंमतीस उठाव करण्यासाठी संघटित संस्थांचा अभाव, या कारणांमुळें हातमाग धंदा तोट्याचा ठरला आहे.

### संघटनेची जरूरी

हातमाग धंद्याचें बस्तान नीट बसविण्याकरतां, आर्थिक घटींत त्याचें स्थान स्थिर करण्यासाठी आणि त्याची कार्यक्षमता वाढविण्याकरतां, विणकरास त्यांचा धंदा फायदेशीर होण्याकरतां व यथावकाशांत आत्मविश्वासानें इतरांशीं स्पर्धा करतां यावी म्हणून प्रारंभीं त्यांस मार्गदर्शन व आर्थिक साह्य करूं शकेल अशा एखाद्या संघटनेंत विणकरांना आणलें पाहिजे. या सर्व गोष्टी सहकारी प्रयत्नांतूनच साधतां येतील. म्हणूनच विणकऱ्यांसाठी सहकारी संस्था स्थापन करण्याचे प्रयत्न मध्यवर्ती सरकार व राज्य सरकारें यांनीं केले.

सहकारी संस्थांच्या स्थापनेचें कार्य निरनिराळ्या राज्यांत विकासाच्या निरनिराळ्या पातळीवर आहे. विणकरांच्या सहकारी संस्थांचा विकास मद्रास, आंध्र व उत्तर प्रदेशांत चांगल्या प्रकारें झालेला आहे. या राज्यांत, कच्चा माल मिळविणें, त्याचा पुरवठा करणें, तयार मालाचा उठाव करणें, या बाबतींत चांगली प्रगति झालेली आहे.

सुधारलेल्या उपकरणांचा पुरवठा, उत्पादनाच्या सुधारलेल्या पद्धतींचें शिक्षण, नमुना तयार करणाऱ्या कारखान्यांची स्थापना आणि कापडाची तपासणी व त्यावर शिक्के मारणें, इत्यादि अनेक योजना चालू केलेल्या आहेत.

### विणकरांच्या सहकारी संस्था

सहकारी संस्था आपल्या सदस्यांना कर्जविषयक सवलती देतात. कच्चा माल मिळविणें आणि त्याचा पुरवठा याकरतां विणकरांना पैसे कर्जाऊ द्यावे लागत नसले तरी त्यांना त्यांच्या मजुरीचे पैसे आगाऊ दिले जातात व पक्का माल घेतांना ते पैसे वळते करून घेतले जातात. आंध्र प्रदेशांतील एका सहकारी संस्थेनें आपल्या सदस्यांसाठी घरबांधणीची योजना चालू केली असून इतरहि सुप्रस्थापित सहकारी संस्था हें उदाहरण गिरवीत आहेत.

प्राथमिक सहकारी संस्था कच्च्या मालाची व इतर सामुग्रीची खरेदी करतात आणि त्यांची किरकोळीनें, रोखीनें वा उधारीनें विक्री करतात. धंद्यासाठी लागणारा निधि ते विणकऱ्यांकडून व इतरांकडून शेअरच्या रूपानें तसेंच ठेवी घेऊन वा अन्य प्रकारें उभारतात. कापड तयार करून विणकरांना जास्तीत जास्त फायदा होईल अशा रीतीनें त्याची विक्री करतात व बाजारभावानें विणकरांना पैसे देतात.

प्राथमिक संस्था या सामान्यतः उत्पादन तसेंच विक्रीव्यवहार करणाऱ्या सहकारी संस्था असतात व या सहकारांच्या व्यवहारास मिळणारा सर्व फायदा प्रत्यक्ष उत्पादकांसच मिळतो. प्राथमिक सहकारी संस्था किंवा अशा संस्था ज्यास संलग्न केलेल्या असतात ती राज्य शिखर (अपेक्स) सहकारी संस्था यांचें प्रत्यक्ष संचालकत्व मुख्यत्वें विणकरांकडेच असतें. या संस्थांना जिल्हा सहकारी बँक किंवा सेंट्रल बँक यांजकडून लागणारा पैसा मिळतो. रिझर्व्ह बँकेकडूनहि त्यांस कर्जे मिळूं शकतात.

### सहकाराचे फायदे

दलालाचें उच्चाटन, सहकारी संघटनांद्वारें कच्च्या मालाचा पुरवठा व तयार मालाची विक्री यामुळें विणकरांना मिळणाऱ्या फायद्याचें मोजमाप पैशांत करतां येणार नाहीं. हातमागाचा धंदा केवळ सहकारी तत्त्वावरच वाढावा वा टिकावा ही कल्पना सर्वत्रांनीं मान्य केलेली आहे. मध्यवर्ती सरकारनें स्थापन केलेल्या सेस फंडांतून राज्य सरकारांना त्याकरतां सढळपणें आर्थिक साह्य दिलें जातें व राज्य सरकारेंहि या बाबतींत आपल्याकडून शिकस्त करीत आहेत.

---

## कंपन्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा

### हिशेब पुरे होण्यास विलंब लागला म्हणून मुदतवाढ मिळणार नाहीं

संबंधित रजिस्ट्रार ऑफ कंपनीज् यांच्याकडून कांहीं खास कारणानें मुदतवाढीची परवानगी मिळाली नसेल तर प्रत्येक कंपनीनें आर्थिक वर्ष पुरें झाल्यावर नऊ महिन्यांच्या आंत वार्षिक सर्वसाधारण सभा घेतलीच पाहिजे असें बंधन कंपनी कायद्यान्वयें असतें. तथापि, नवा कायदा १ एप्रिल, १९५६ रोजीं अंमलांत आल्यानंतर त्यांतील कंपनीचे हिशेब सादर करण्याच्या पद्धतींत महत्त्वाचे बदल करण्यांत आले असल्यामुळें त्यांची कंपनीच्या संचालकांस, तसेंच हिशेब–तपासनीसास नीट माहिती व्हावयाची असल्यानें योग्य प्रकरणीं अशी मुदतवाढ देण्याबाबत निष्कारण कडकपणा स्वीकारूं नये, असा सल्ला रजिस्ट्रार ऑफ कंपनीज् यांस दिलेला होता व कंपन्यांनींहि वेळोवेळीं मुदतवाढ मागितली होती.

परंतु आतां हा नवा कायदा अस्तित्वांत येऊन सुमारें तीन वर्षे लोटलीं असल्यानें अशा प्रकारें वार्षिक सभा भरविण्यांत सढळपणें मुदतवाढ देणें उचित होणार नाहीं. कंपनी कायदा दुरुस्ती समितीनें सदर कायद्यांत सुधारणा करण्यासंबंधीं अलीकडेच विचार केला असतां याच मतास पुष्टि दिलेली आहे. म्हणून ३१ मार्च, १९५९ नंतर कंपनीचें वार्षिक हिशेब तपासून पुरे होण्यास विलंब लागला, हें कारण ह्यापुढें चालणार नाहीं.

---

### दि बँक ऑफ अमेरिकेचीं क्रेडिट कार्डे

दि बँक ऑफ अमेरिकेनें क्रेडिटकार्डे काढलीं आहेत. हें कार्ड धारण करणारानें कोणतीहि खरेदी करावी; महिनाअखेर त्या खरेदीचीं बिलें बँक भागवील; ह्या योजनेंत सामील होणाऱ्या दुकानदारांकडून ६% पर्यंत कमिशन बँक कापून घेईल. ठेवीदारांप्रमाणें इतरांनाहि हीं क्रेडिटकार्डे बँक देऊं शकेल.

सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

## दि बेळगांव बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २१ शाखा

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षें | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षें | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षें | ,, | ४ | ,, |

★ सेव्हिंग्ज खातें द. द. शें. २ टक्के

होम सेव्हिंग्ज खातें ,, २॥ ,,

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, एक कोटी, सदतीस लाख |

विशेष माहितीसाठी आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | $२\frac{१}{२}$ टक्के |
| २ वर्षें | $२\frac{३}{४}$ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | $३\frac{१}{२}$ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१—७—५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई—१.

(स्थापना : १९११)

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष

मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष

रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष

एकूण ठेवी : रु. १२ कोटी

खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[शेड्यूल्ड बँक]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, बार्शी, नासिक, लोणंद, कोल्हापूर, हलकर्णी, इचलकरंजी व फलटण.

लौकरच मुंबई दादर भागांत शाखा सुरू करणेंत येत आहे.

ता. ३०-६-५८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४,१५,००० |
| ठेवी | रु. | १,३१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५१,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४·००

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १·५० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०·५० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## भाडें नियंत्रण कायद्याचें १२ (३) (ब) कलम
### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

मुंबई भाडेंनियंत्रणाचा कायदा (Bombay Rent, Hotel and Lodging House Rates Control Act), क. १२ (३) (ब)—थकलेलें भाडें भाडेकऱ्यानें दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्या दिवशीं दिलें पाहिजे अथवा कोर्टानें ठरवून दिलेल्या दुसऱ्या कोणत्याहि तारखेस दिलें पाहिजे—ही दुसरी तारीख कोर्टानें दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्याच दिवशीं ठरविली पाहिजे असें नाहीं—डिक्री होण्यापूर्वी केव्हांहि अशी तारीख ठरवितां येते.

हकीगत, विवेचन व निकाल—गुलाम हुसेन कालुमिया या इसमाच्या मालकीचें एक घर असून त्या घरांत महंमद उमर अझीझुल्ला हा इसम भाडेकरी होता. त्याच्याकडे १०२ रु. ८ आ. भाडें थकल्यामुळें घरमालकानें त्याच्याविरुद्ध दावा आणला. भाडेकऱ्याला आपल्या घरांतून काढून देण्यांत यावें अशी घरमालकानें आपल्या दाव्यांत मागणी केली आणि त्याकरितां दोन कारणें दिलीं. पहिलें कारण असें कीं, आपलें घर आपणांस स्वत: राहण्याकरितां पाहिजे आहे आणि दुसरें कारण असें कीं, भाडेकऱ्यानें भाडें थकविलें आहे. दाव्याच्या सुनावणीची तारीख १८ ऑगस्ट १९५४ ही ठरविण्यांत आली. ता. २३ डिसेंबर १९५४ रोजीं भाडेकऱ्यानें असा अर्ज केला कीं, थकलेलें भाडें देऊन टाकण्याची आपणांस परवानगी असावी. हा अर्ज भाडेकऱ्यानें दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्या दिवशीं केला नसल्यामुळें भाडें देऊन टाकण्याची परवानगी आपण देऊं शकत नाहीं असा निकाल अव्वल कोर्टानें दिला. यावर केलेल्या अपिलांत डिस्ट्रिक्ट जज्जानें हा निकाल फिरवून भाडेकऱ्याचा अर्ज मंजूर केला. यावर घरमालकानें हायकोर्टांत रिव्हिजन अर्ज केला.

मुंबई भाडेंनियंत्रण कायद्याच्या (Bombay Rents, Hotel and Lodging House Rates Control Act), क. १२ (३) (ब) चा आशय पुढीलप्रमाणें आहे:—

"दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्या दिवशीं अथवा कोर्टानें ठरवून दिलेल्या दुसऱ्या कोणत्याहि तारखेस जर भाडेकरी त्या तारखेपर्यंत देणें असलेलें भाडें देईल अथवा कोर्टांत जमा करील आणि दाव्याचा निकाल लागेपर्यंत तें भाडें नियमितपणें देईल तर त्या दाव्यांत भाडेकऱ्याला घरांतून काढून देण्याची डिक्री दिली जाणार नाहीं."

हायकोर्टांत घरमालकातर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, भाडेकऱ्यानें थकलेलें भाडें दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्या दिवशीं दिलें पाहिजे अथवा तें देण्याकरितां दुसरी कोणती तारीख ठरविण्याकरितां दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्याच दिवशीं अर्ज केला पाहिजे. दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्या दिवशीं जर भाडेकऱ्यानें थकलेलें भाडें दिलें नाहीं अथवा तें भाडें देण्याकरितां दुसरी तारीख ठरविण्याकरिता दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्या दिवशींच जर अर्ज केला नाहीं तर भाडेकऱ्याला घरांतून काढून टाकूं नये असा हुकूम कोर्ट देऊं शकत नाहीं.

हा युक्तिवाद हायकोर्टानें मान्य केला नाहीं. मुंबई भाडें-नियंत्रण कायद्याच्या क. १२ (३) (ब) मध्यें दिलेल्या दोन शर्ती अशा आहेत कीं, थकलेलें भाडें आणि खर्च दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्या दिवशीं भाडेकऱ्याने दिलें पाहिजे अथवा कोर्टानें ठरवून दिलेल्या अन्य कोणत्याहि तारखेस दिलें पाहिजे. ही तारीख कोर्टानें दाव्याच्या सुनावणीच्या पहिल्या दिवशींच ठरवून दिली पाहिजे असें क. १२ (३) (ब) मध्यें कोठेंहि म्हटलेलें नाहीं. डिक्री होण्यापूर्वी कोणत्याहि दिवशीं अशी तारीख ठरवितां येतें. प्रस्तुत केसमध्यें ज्याअर्थी ही तारीख ठरविण्याकरितां दावा निकालांत निघण्यापूर्वी भाडेकऱ्यानें अर्ज केला होता त्याअर्थी भाडेकऱ्याला घरांतून काढून देण्यांत येऊं नये असा हुकूम देण्याचा कोर्टाला अधिकार होता. अव्वल कोर्टानें तो अधिकार बजावला नाहीं ही त्या कोर्टाची चूक होय.

वरीलप्रमाणें निकाल देऊन हायकोर्टानें डिस्ट्रिक्ट जज्जाचा निकाल कायम केला आणि रिव्हिजन-अर्ज नामंजूर केला.

'न्यायबोध" जानेवारी, १९५९

---

**शास्त्रीय विषयावरील पुस्तकें**—इंग्लिश व युरोपीय भाषांतील शास्त्रीय विषयावरील पुस्तकांचीं हिंदींत भाषांतरें करवून घेण्याचें मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणखात्यानें ठरविलें आहे. १० ते १४ वर्षे वयाच्या विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शास्त्रीय ज्ञान देण्याच्या उद्देशानें हा उपक्रम हातीं घेण्यांत येणार आहे. पुस्तकांच्या प्रसिद्धीकरणासाठी प्रकाशकांकडून सूचना मागविण्यांत आल्या आहेत.

**हिंदी शास्त्रज्ञांची निवड**—अमेरिकेंतील इलिनॉइस राज्यांतील अणुविज्ञानशाळेंत उच्च शिक्षण घेण्यासाठी भारताच्या अणुशक्ति मंडळावरील चार तरुण शास्त्रज्ञांची निवड करण्यांत आली आहे. आशिआंतील राष्ट्रांपैकी भारतामधून सर्वांत अधिक शास्त्रज्ञांची निवड करण्यांत आली आहे. त्यानंतर जपानमधून तीन, व्हिएटनाममधून दोन व सयाममधून एक, अशी निवड करण्यांत आली आहे.

**रेल्वेमार्गाची उंची कमी केली**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्यासाठी रशिआकडून येणारी यंत्रसामुग्री अजस्र असते. अशा प्रकारची कांहा यंत्रसामुग्री भिलई येथें वाहून नेण्यासाठी साऊथ-ईस्टर्न रेल्वेला आपल्या मार्गाची उंची तीन ठिकाणीं कमी करावी लागली. असें केलें नसतें तर यंत्रसामुग्री कारखान्याच्या जागीं पोंचण्यास ४ महिने लागले असते. हें काम चार दिवसांत करण्यांत आलें.

**रशिआ-युगोस्लाव्हिआ व्यापारी करार**—रशिआ व युगोस्लाव्हिआ ह्यांच्या दरम्यान एक व्यापारी करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें युगोस्लाव्हिआ रशिआला पोलादी नळ, सिमेंट, लोकरीचें कापड, इत्यादि माल पुरविणार असून रशिआकडून गहूं, कोळसा, पेट्रोल, औषधें, यंत्रसामुग्री, इत्यादि माल घेणार आहे. १९५९ सालांत पूर्वीपेक्षा अधिक व्यापार होईल, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

**छोट्या उद्योगधंद्यांना मदत**—मध्यप्रदेश सरकारनें जबलपूरनजीकच्या एका खेड्यांतील ग्रामोद्योगांना मदत करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी एका सहकारी संस्थेची स्थापना करण्यांत आली आहे. संस्थेला सरकारकडून २७,००० रुपयांची मदत देण्यांत येणार आहे. सरकारच्या प्रयत्नामुळें लोहारांचीं ३० कुटुंबें आणि सुतारांचीं ३० कुटुंबें पुन्हां कामाला लागतील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.